५.४

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/३३/२०१९
दि.१५/०४/२०१९.

०1C

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.रितेश मोजेस टोपेरी, ...............अपिलार्थी
सायबा प्रसाद व्हिल, जुन्या मराठी शाळेजवळ,
काशीगाव, काशिमिरा, पो.मिरा,
ता.जि.ठाणे ४०११०७.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

## -: विवेचन :-

श्री.रितेश मोजेस टोपेरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.०८/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मालमत्ता क्र.एन०१००४२७५७०१६, एन०१००४२७५७०१७, एन०१००४२७५७०१८, एन०१००४२७५७०१९, एन०१००४२७५७०२०, एन०१००४२७५७०२१, एन०१००४२७५७०२२, एन०१००४२७५७०२३, एन०१००४२७५७०२४, एन०१००४२७५७०२५, एन०१००४२७५७०२६, एन०१००४२७५७०२७ वरील उल्लेख केलेल्या मालमत्ता बिलावर वेगळ्या किंवा दुसऱ्या भोगवटाधारकांचे नाव कुठल्या पुराव्यानिशी चढविण्यात आली आहेत व कोणत्या अधिकाऱ्याच्या निगराणीखाली करण्यात आले आहे. त्याबाबतची माहिती प्रत आम्हाला देण्यात यावी. याबद्दलची जी काही शासकीय फी असेल ती आम्ही भरण्यास तयार आहोत. तरी ही सर्व कागदपत्रे आम्हाला लवकरात लवकर प्राप्त करुन द्यावी ही विनंती.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१२/०३/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०४/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/४७/२०१९ दि.०४/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ कामी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१५/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी

Scanned by CamScanner

तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/६०/२०१९ दि.११/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०८/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्याने सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

O/C

**प्रति:-**

१) श्री.रितेश मोजेस टोपेरी,
सायबा प्रसाद व्हिल, जुन्या मराठी शाळेजवळ,
काशीगाव, काशिमिरा, पो.मिरा,
ता.जि.ठाणे ४०११०७.

16/4/19

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर) 15/4/19

३) सहा.जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ 16/4/19

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner